महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक,अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग


"वृक्षवल्ली आम्हा सोयरेवनचरे"

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगडपी .नं. 402 201

दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in


जावकक्रमांक:ब/20/जमिन/व.सं./ 770 /2022-23. दिनांक27/05/2022

प्रति,

कार्यकारी अभियंता,

एम. एम. आर. डी. ए.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पुर्व, मुंबई

विषयः- **वन जमिन रायगड.**

Diversion of 0.5097 Private Forest land thereof for Non-Forest activity in Village Jasai tal Uran District Raigad in Maharashtra.

संदर्भः- आपलेकडील पत्र क्र. MMRDA/MTHL-PIU/Pac-3/Forest Land/1144/2022, दिनांक 22/04/2022

संदर्भिय पत्रान्वये विषयांकित वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावांची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1) प्रस्तावांत क्षेत्रविवरण तक्त्यावरून मौजे चिर्ले ता. उरण येथील स.नं. 60/1 व 60/3बी चे क्षेत्र वनेतर क्षेत्र म्हणून दर्शविलेले आहे. तथापी सदर क्षेत्र खाजगी वनाचे असल्याने वनक्षेत्र म्हणून क्षेत्र विवरण तक्त्यात घेणे आवश्यक तसेच त्यानुसार नकाशे व इतर आवश्यकते दस्तऐवजामध्ये दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

2) प्रस्तावांत क्षेत्रविवरण तक्त्यावरून मौजे जासई ता. उरण येथील स.नं. 127/3अ/2ब चे क्षेत्र 0.0930 हे., 71ब/1 चे 1.5190 हे. व 71/3 चे क्षेत्र 0.0400 हे. हे वनेतर क्षेत्र म्हणून दर्शविलेले आहे. तथापी सदर क्षेत्र खाजगी वनाचे असल्याने वनक्षेत्र म्हणून क्षेत्र विवरण तक्त्यात घेणे आवश्यक तसेच त्यानुसार नकाशे व इतर आवश्यकते दस्तऐवजामध्ये दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

3) मौजे जासई येथील स.नं. 71 चे क्षेत्र आकारबंदप्रमाणे 10.762 हेक्टर असल्याचे दिसून येत आहे. त्यापैकी या कार्यालयाकडील अभिलेखानुसार 10.3878 हेक्टर क्षेत्रास भारतीय वन अधिनियम, 1927 चे कलम 35 चे तरतुदी लागू होऊन त्यास महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनयिम 1975 अंतर्गत खाजगी वनम्हणून घोषीत झालेले आहे. तयामुळे सदर प्रकल्पांत बांधीत होणारे स.नं. 71 चे संपुर्ण क्षेत्र प्रस्तावात वनक्षेत्र म्हणून समाविष्ठ करणे आवश्यक आहे. तरी याबाबत खात्री करून त्यामध्ये दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

4) प्रस्तावात बाधीत होणारे वनक्षेत्राचे 7/12 उतारे सामील करणेत आलेले नाहीत. तरी प्रमाणित मुळ 7/12 उतारे प्रस्तावात सामील करावे. तसेच त्यांचे आंग्ल भाषेतील भाषांतरीत प्रत प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

5) प्रस्तावांत बाधीत होणारे क्षेत्रांमध्ये वनहक्क बाधीत होत नसल्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील प्रमाणपत्र व त्यासमवेत संपूर्ण दस्तऐवज आंग्लभाषेत भाषांतरीत करून प्रस्तावांत सामील करणे आवश्यक राहील.

6) प्रस्तावांत बाधीत होणारे वनक्षेत्राचे चतु:सिमा दर्शविणारा क्षेत्र विवरण तक्ता प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

7) प्रस्तावात मागणी क्षेत्र 1.00 हे. वनक्षेत्रापेक्षा जास्त होत असल्याने पर्यायी वनीकरणासाठी वनेतर क्षेत्राचा तपशिल जसे टोपोशिट, गावनंकाशा, जिओ डिजीटल नकाशा, केएमएल फाईल, पर्यायी वनीकरण योजना, सदर पर्यायी वनीकरणासाठी उपयुक्त असलेबाबत संबंधित उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र, वनेतर क्षेत्राचे 7/12 व फेरफार इ. प्रस्तावात समाविष्ठ करणे आवश्यक राहील.

8) बाधीत होणारे वनक्षेत्राची संपुर्ण तपशिल दर्शविणारी केएमएल फाईल सीडीमध्ये उपलब्ध करणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव आवश्यकत्या दस्तऐवजासह आठ प्रती या कार्यालयास सादर करणेत यावा. तसेच सदर प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर देखील या कार्यालयाचे स्तरावर सादर करणेत यावा. सोबत प्रस्तावाचे संच परत करणेत येत आहेत.

(आशिष ठाकरे, भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

प्रतः- सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल व वन परिक्षेत्र अधिकारी, उरण यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- वन परिक्षेत्र अधिकारी यांनी वनक्षेत्रांत वृक्षतोड होणार आहे अगर कसे याबाबत खात्री करुन जर वृक्षतोड होणार असेल तर बाधीत होणारे वृक्षांचे यादीसह वृक्षतोडीचे अंदाजपत्रक आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन आठ प्रती अंदाजपत्रक सहा. वनसंरक्षक, पनवेल यांचेमार्फत या कार्यालयास सादर करावा. तसेच प्रस्तावित वनक्षेत्रात प्रकल्प यंत्रणेकडून वनभंग झाला आहे अगर कसे याबाबत अहवाल सहा. वनसंरक्षक, पनवेल यांचेमार्फत आवश्यकत्या दस्तऐवजासह सादर करावा.

प्रतः वनक्षेत्र सर्व्हेक्षक, विभागीय कार्यालय, अलिबाग यांना माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.